ePaper

वर्ष - 9 | अंक -62 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

www.mahaenews.com | रविवार, दि. 26 ऑक्टोबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## गृहखातं अजगरासारखं निपचित... महिला डॉक्टरच्या मृत्यूवरून संजय राऊत बरसले



### आतील पानांत


- अखेरच्या वनडेत ऑस्ट्रेलियाने टेकले गुडघे
- सलमानसोबत दिसणार 'त्रिशा'!
- लोकांनी आम्हाला हुंड्यात मत द्यावं!
- शहरातील पहिला पादचारी सेतू!


## पंतप्रधान नरेंद्र मोदींची घेतली भेट | विकासाचाच अजेंडा घ्या पुढे – एकनाथ शिंदे

# महायुतीत मतभेद नको!

## "संबंधांमध्ये मिठाचा खडा पडू नये"; शिंदेंचा इशारा; बिहारमध्ये एनडीएचा विजय निश्चित

| मुंबई | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**"महायुतीत कोणतेही मतभेद होऊ नयेत. संबंधांमध्ये मिठाचा खडा पडू नये, याची काळजी सर्वांनी घ्यावी," असा स्पष्ट आणि भावनिक इशारा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची दिल्लीतील भेट घेऊन ते मुंबईत परतल्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधत महायुतीच्या एकात्मतेचा आणि विकासकेंद्रित विचारधारेचा संदेश दिला.**



एकनाथ शिंदे यांनी दिल्लीतील पंतप्रधान मोदींच्या भेटीदरम्यान महायुतीतील एकात्मतेचा संदेश दिला. बिहार निवडणुकीवरील आत्मविश्वास, साताऱ्यातील घटनेवरील तीव्र प्रतिक्रिया, आणि काँग्रेसच्या टीकेला उत्तर देत त्यांनी स्पष्ट केले की — "महायुती ही एक कुटुंब आहे, त्यात मतभेदांना जागा नाही."

शिंदे म्हणाले, "केंद्रातील सत्ताधारी भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) आणि

> "महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमी महाराष्ट्रातील संतांचा उल्लेख करतात.
> **-एकनाथ शिंदे,** उपमुख्यमंत्री

महाराष्ट्रातील सत्ताधारी महायुती ही एकच विचारधारा, एकच नेतृत्व आणि एकाच विकासाच्या अजेंड्याने पुढे जाणारी एकत्र कुटुंब आहे. पंतप्रधान मोदी हे या कुटुंबाचे मार्गदर्शक आहेत. त्यांनी नेहमीच विकासाचा आणि राष्ट्रहिताचा मार्ग दाखवला आहे. त्यामुळे निवडणुका असोत वा विकासकामे, आपण सर्वांनी एकत्र राहूनच पुढे जावे, ही माझी विनंती आहे."

### केंद्र-राज्य विषयांवर सकारात्मक चर्चा

दिल्लीतील भेटीदरम्यान पंतप्रधानांशी केंद्र आणि राज्य सरकारच्या अखत्यारितील विविध विषयांवर सकारात्मक चर्चा झाल्याचेही शिंदे यांनी सांगितले. त्यांनी सांगितले की, "राज्याच्या विकासासाठी केंद्राकडून सहकार्य मिळत आहे. महाराष्ट्रातील अनेक मोठ्या प्रकल्पांवर पंतप्रधानांचा विशेष भर आहे. पंतप्रधान मोदी महाराष्ट्रातील संतांच्या परंपरेचा नेहमी उल्लेख करतात. म्हणूनच कार्तिकी एकादशीच्या पार्श्वभूमीवर मी संत तुकाराम महाराजांची मूर्ती पंतप्रधानांना भेट दिली."

### स्थानिक स्वराज्य निवडणुकांबाबत महत्त्वाचा संदेश

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा उल्लेख करताना शिंदे म्हणाले, "या निवडणुका म्हणजे तळागाळातील कार्यकर्त्यांसाठी एक शाळाच आहे. कार्यकर्त्यांना लढायची इच्छा असते, पण अंतिम निर्णय वरिष्ठ नेतृत्व घेत असते. निर्णय झाल्यानंतर सर्वांनी शिस्त पाळणे हेच महत्त्वाचे आहे. मतभेद निर्माण करून महायुतीच्या एकात्मतेवर आघात होऊ नये."त्यांनी पुढे सांगितले की, "महायुतीचा पाया कार्यकर्त्यांवरच आहे. त्यांच्यात असलेला आत्मविश्वास आणि शिस्तच आपल्याला विजय मिळवून देते. त्यामुळे महायुतीतील प्रत्येकाने 'आपण एक आहोत' या भावनेने काम करणे आवश्यक आहे."

### बिहार निवडणुकीवरही आत्मविश्वास

बिहार विधानसभा निवडणुकीबाबत बोलताना शिंदे म्हणाले, "राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) बिहारमध्ये निश्चितच बहुमताने विजयी होईल. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली बिहारच्या विकासासाठी केंद्र सरकारने मोठा निधी दिला आहे. मुंबई, ठाणे आणि एमएमआरडीए क्षेत्रातील बिहारी बांधवांसोबत आमच्या बैठकाही सुरू आहेत. सर्वजण एनडीएच्या विजयासाठी झटत आहेत."

त्यांनी असेही नमूद केले की, "बिहारमधील जनतेने विकास आणि स्थैर्याच्या नावावर विश्वास दाखवला आहे. मोदींच्या नेतृत्वाखाली एनडीए पुन्हा सत्ता मिळवेल याबद्दल कोणतीही शंका नाही."

### साताऱ्यातील महिला डॉक्टरवरील अत्याचारप्रकरणी संताप

साताऱ्यातील महिला डॉक्टरवरील अत्याचारप्रकरणी उपमुख्यमंत्र्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. शिंदे म्हणाले, "ही घटना अत्यंत क्लेशदायक आणि दुर्दैवी आहे. आरोपींवर कठोर कारवाई केली जाईल. एका आरोपीला अटक झाली असून उर्वरित आरोपींनाही लवकरच पकडले जाईल. दोषींना कोणत्याही प्रकारे पाठीशी घातले जाणार नाही."त्यांनी पुढे स्पष्ट केले की, "महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न हा आमच्या सरकारसाठी सर्वोच्च प्राधान्याचा आहे. गुन्हेगारांना संरक्षण मिळणार नाही, कितीही प्रभावशाली असले तरीही कारवाई नक्की होईल."

### काँग्रेसची टीका : "शिंदे स्वतःला वाचवण्यासाठी दिल्लीत गेले"

दरम्यान, उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या दिल्ली दौऱ्यावरून काँग्रेसने जोरदार टीका केली आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, "भाजप आपल्या मित्रपक्षांना स्वबळावर लढायला लावून शिंदेसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाचा काटा काढण्याचा डाव आखत आहे.

## पुण्यातील धंगेकर-मोहोळ वादावर प्रतिक्रिया

पुण्यात शिवसेना नेते रवींद्र धंगेकर आणि केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यातील वादावर शिंदे म्हणाले, "धंगेकरांना मी स्पष्ट संदेश दिला आहे. आवश्यक असल्यास मी स्वतः त्यांच्याशी बोलेन. मतभेद मिटवणे आणि संवाद वाढवणे हेच योग्य आहे."त्यांनी स्पष्ट केले की, "महायुती म्हणजे केवळ राजकीय आघाडी नाही, तर ती एक विचारसरणी आहे. त्यात तात्कालिक मतभेद असले तरी उद्दिष्ट एकच — जनतेचा विकास." राज्यात गेल्या काही दिवसांपासून महायुतीतील नाराजी आणि उमेदवारी वाटपावरून तणावाची चर्चा सुरू असतानाच शिंदेंनी दिलेली ही प्रतिक्रिया महत्त्वपूर्ण ठरते. त्यांच्या वक्तव्यातून स्पष्ट संकेत मिळतो की, ते महायुतीत एकात्मतेची नाळ टिकवण्यासाठी प्रयत्नशील आहेत. भाजपा नेतृत्वासोबत ते थेट संवाद साधत असून, कार्यकर्त्यांपर्यंत सकारात्मक संदेश पोहोचवण्याचा प्रयत्न करीत आहेत.

समाजाला पाठिंब्याची भूमिका

## मुरलीधर मोहोळांची मुख्यमंत्र्यांशी चर्चा

# ‘जैन बोर्डिंग’ प्रकरणात भाजपची सारवासारव

। पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुण्यातील ‘जैन बोर्डिंग प्रकरण’ हे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत अंगलट येण्याची शक्यता लक्षात येताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात लक्ष घातले. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी भेट घेऊन चर्चा केल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी आदेश देताच भाजपने या प्रकरणात शनिवारी सारवासारव केली. तसेच जैन समाजाबरोबर असल्याची भूमिकाही जाहीर केली.**

## स्थानिक नेते आणि मोहोळ सक्रिय



पुण्यातील ‘जैन बोर्डिंग’च्या जागेचा वाद गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. या जागेच्या व्यवहारामध्ये मोहोळ यांचा सहभाग असल्याचा आरोप शिवसेना (शिंदे) पक्षाचे महानगरप्रमुख, माजी आमदार रवींद्र धंगेकर करत आहेत. परंतु संबंधित बांधकाम व्यावसायिक हा भागीदार नसल्याचा दावा मोहोळ यांनी केला आहे. दरम्यान, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जैन समाजाचा रोष पत्करावा लागण्याची शक्यता असल्याने मुख्यमंत्री फडणवीस यांनी या प्रकरणात लक्ष घातले. मुख्यमंत्र्यांनी आदेश देताच शनिवारी दिवसभर भाजपचे स्थानिक नेते आणि मोहोळ सक्रिय झाले. ‘भाजप जैन समाजाच्या पाठीशी आहे. या प्रकरणात समाजाच्या मागण्या आणि भूमिका मुख्यमंत्री फडणवीस यांच्यापर्यंत पोहोचवून त्या सोडविण्यासाठी भाजप प्रयत्नशील आहे. जैन बोर्डिंगचा व्यवहार रद्द करण्याची मागणी जैन मुनी आणि जैन समाजाकडून केली जात आहे. त्यासाठी आंदोलन करून मोर्चा काढण्याचा इशाराही जैन बांधवांनी दिला. या मोर्चात सहभागी होण्याची भाजपची तयारी आहे,’ अशी भूमिका भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे, माजी सभागृह नेते गणेश बिडकर यांनी पत्रकार परिषद घेऊन स्पष्ट केली.भाजपच्या पदाधिकाऱ्यांची पत्रकार परिषद सुरू असतानाच मुरलीधर मोहोळ यांनी जैन बोर्डिंग येथे जाऊन जैन मुनींशी संवाद साधला.‘भाजप सदैव जैन समाजाच्या पाठिशी असून, जैन बांधवांना न्याय मिळण्यासाठी प्रयत्न करणार आहे’ असे आश्वासन मोहोळ यांनी दिले. या प्रकरणात माझ्यावर झालेले आरोप खोटे आहेत. जैन समाजाला न्याय मिळवून दिला जाईल. पुढील काही दिवसांत हा प्रश्न संपलेला असेल. हा विषय मिटविण्यासाठी जैन मुनींची भेट घेतली. पुण्यात शिवाजीनगर येथील मॉडेल कॉलनीमध्ये ‘शेठ हिराचंद नेमचंद जैन दिगंबर बोर्डिंग ट्रस्ट’ या धर्मादाय संस्थेची (स्थापना १९८५) ‘जैन बोर्डिंग’ ही वसतिगृहाची जागा आहे. ज्या विकसकाने ही जागा विकासासाठी घेतली, तो बांधकाम व्यावसायिक केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचा व्यावसायिक भागीदार आहे. काही विश्वस्तांनी जमीन विकताना आवश्यक परवानगी आणि कायदेशीर प्रक्रिया पूर्ण न करता व्यवहार केल्याचा आरोप आहे. या व्यवहारामुळे जैन समाजात रोष आहे. या प्रकरणात आता धर्मादाय आयुक्तांनी ‘जैसे थे’ स्थिती ठेवण्याचा आदेश दिला आहे. हा व्यवहार रद्द करावा, अशी ‘बोर्डिंग बचाव कृती समिती’ची मागणी आहे. ट्रस्टच्या जागेवर मंदिर आहे का, त्याचा तपशील काय आहे, मंदिराचे व्यवस्थापन कोण करत आहे, जागेचे क्षेत्रफळ किती आहे, या सर्व बाबींचा अहवाल मागविण्यात आला आहे. २७ ऑक्टोबरपर्यंत हा अहवाल द्यायचा आहे. हा व्यवहार रद्द करावा, अशी ‘बोर्डिंग बचाव कृती समिती’ची मागणी आहे.पुण्यातील ‘जैन बोर्डिंग’च्या जागेचा वाद गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. या जागेच्या व्यवहारामध्ये मोहोळ यांचा सहभाग असल्याचा आरोप शिवसेना (शिंदे) पक्षाचे महानगरप्रमुख, माजी आमदार रवींद्र धंगेकर करत आहेत. परंतु संबंधित बांधकाम व्यावसायिक हा भागीदार नसल्याचा दावा मोहोळ यांनी केला आहे. दरम्यान, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जैन समाजाचा रोष पत्करावा लागण्याची शक्यता असल्याने मुख्यमंत्री फडणवीस यांनी या प्रकरणात लक्ष घातले. मुख्यमंत्र्यांनी आदेश देताच शनिवारी दिवसभर भाजपचे स्थानिक नेते आणि मोहोळ सक्रिय झाले. ‘भाजप जैन समाजाच्या पाठीशी आहे.

### ‘भाजप जैन समाजाच्या पाठीशी

जैन बोर्डिंगचा व्यवहार रद्द करण्याची मागणी जैन मुनी आणि जैन समाजाकडून केली जात आहे.अशी भूमिका भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे, माजी सभागृह नेते गणेश बिडकर यांनी पत्रकार परिषद घेऊन स्पष्ट केली.भाजपच्या पदाधिकाऱ्यांची पत्रकार परिषद सुरू असतानाच मुरलीधर मोहोळ यांनी जैन बोर्डिंग येथे जाऊन जैन मुनींशी संवाद साधला. ‘भाजप सदैव जैन समाजाच्या पाठिशी असून, जैन बांधवांना न्याय मिळण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

## दादांचा आदेश : प्रशासनाकडून कर्जाची माहिती

# महापालिकेने 559 कोटी 91 लाख रुपयांचे कर्ज घेतले

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेने आतापर्यंत ५५९ कोटी ९१ लाख रुपयांचे कर्ज घेतले आहे. महापालिकेचे ‘एए प्लस क्रेडिट रेटिंग’ पत मानांकन आहे, असा दावा महापालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांनी केला आहे.**



भोसरीचे भाजप आमदार महेश लांडगे यांनी महापालिकेवर असलेल्या कर्जाची माहिती मागविली होती. त्यांना लेखी पत्राद्वारे महापालिकेने माहिती दिली आहे. कासारवाडीतील नाशिक फाटा येथील दुमजली उड्डाणपूल बांधण्यासाठी १५९ कोटी ९१ लाख रुपयांचे कर्ज घेण्यात आले होते. ते कर्ज ३० वर्षांसाठी आहे. त्यापैकी ९१ कोटी ९० लाख रुपयांची परतफेड करण्यात आली आहे.मुळा नदी सुधार प्रकल्पासाठी चार वर्षे कालावधीसाठी म्युन्सिपल बॉण्डद्वारे २०० कोटी रुपयांचे कर्ज घेतले आहे. त्यापैकी ९० कोटी रुपयांची परतफेड केली आहे. हरित सेतू आणि टेल्को रस्त्यावर अर्बन स्ट्रीट डिजाईनद्वारे सुशोभिकरण करण्यासाठी हरित कर्जरोखेद्वारे २०० कोटी रुपयांचे कर्ज काढण्यात आले आहे. त्याचा कालावधी पाच वर्षे आहे. त्यापैकी १३ कोटी ५० लाख रुपयांची परतफेड करण्यात आली आहे. आतापर्यंत एकूण ३६४ कोटी ५१ लाख रुपयांचे कर्ज फेडणे बाकी आहे. ते खर्च केंद्र व राज्य शासनाची परवानगी घेऊनच काढण्यात आल्याचे लेखा विभागाने म्हटले आहे. कर्जाचे हप्ते नियमितपणे अदा केले जात असून, कर्ज व व्याज परतफेडीकरिता महापालिका आर्थिकदृष्ट्या पूर्णपणे सक्षम आहे. क्रसंस्थेने महापालिकेस एए प्लस स्टेबल क्रेडिट रेटिंग पत मानांकन दिले आहे.

### भाजप आमदाराने मागविली माहिती

कामाच्या नावावर महापालिकेला कर्जबाजारी केल्याची दबक्या आवाजात चर्चा आहे. यात किती तथ्य आहे, याची माहिती काढण्याची सूचना उपमुख्यमंत्री, पालकमंत्री अजित पवार यांनी महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांना दिली होती. तसेच महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता असताना मी एक रुपयाही कर्ज होऊ दिले नाही, अशी टिप्पणी केली. आगामी महापालिका निवडणुकीत कर्जाचा मुद्दा राजकीय होऊ शकतो हे लक्षात येताच भाजपचे आमदार महेश लांडगे यांनी प्रशासनाकडे लेखी माहिती मागवली.

सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नाशिकफाट्याला उभा राहणार

# शहरातील पहिला पादचारी सेतू!

## कासारवाडीतील नाशिक फाटा चौकात "फूट ओव्हरब्रीज

पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: शहरातील नागरिकांना बस, मेट्रो, एसटी, रेल्वे आदी सार्वजनिक वाहतुकीचा पर्याय उपलब्ध व्हावा, सुरक्षितपणे स्टेशन व थांब्यांपर्यंत तसेच, रस्त्याच्या पलीकडे पोहोचण्यासाठी महामेट्रोकडून कासारवाडीतील नाशिक फाटा चौकात फूट ओव्हरब्रीज (पादचारी पूल) उभारण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांना वेगवेगळ्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा लाभ सहजपणे घेता येणार आहे. सार्वजनिक वाहतुकीसाठी उभारलेला तो शहरातील पहिला पादचारी सेतू ठरणार आहे.**



नाशिक फाटा चौकात निगडी ते दापोडी दुहेरी बीआरटी मार्ग आहे. भोसरी, चाकण ते पुणे अशी बससेवा आहे. कासारवाडी रेल्वे स्टेशन आहे. पुणे-नाशिक महामार्ग असल्याने तेथील एसटी थांब्यावरून नाशिकला ये-जा करता येते. मेट्रोचे नाशिक फाटा स्टेशन या चौकात आहे. जेआरडीटाटा दुमजली उड्डाण पुलावरून कासारवाडीहून भोसरीला जाता येते. तसेच, उड्डाण पुलावर नाशिक फाटा ते वाकड बीआरटी मार्ग आहे. त्यामुळेचौकातून दररोज हजारो नागरिक ये-जा करतात.

या चौकात पादचारी व प्रवाशांना रस्ता ओलांडण्यासाठी तसेच, स्टेशन व थांब्यांवर ये-जा करण्यासाठी सुरक्षित असा स्वतंत्र मार्ग नाही. त्यामुळे नागरिकांना जीव धोक्यात घालून ये-जा करावी लागते. त्यात अपघात होण्याचा धोका अधिक आहे. सुरक्षित वाहतुकीसाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून येथे पादचारी पूल उभारण्यात येणार होता. मात्र, महामेट्रोने त्यासाठी पुढाकार घेत प्रत्यक्ष कामही सुरू केले.

### प्रवाशांना सुरक्षितपणे रस्ता ओलांडता येणार

दापोडी ते निगडी बीआरटी बस, नाशिक फाटा ते वाकड बीआरटी बस, रेल्वे, मेट्रो तसेच, पादचाऱ्यांना सुरक्षितपणे ये-जा करता येईल, असा पादचारी पूल उभारण्याबाबत पिंपरी-चिंचवड महापालिकेने महामेट्रोस सांगितले आहे. महापालिका, वाहतूक पोलिसांशी चर्चा करून हा पूल उभारण्यात परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे धोकादायकरीत्या रस्ता ओलांडण्याचा प्रकार पूर्णपणे थांबणार आहे. बापूसाहेब गायकवाड, सह शहर अभियंता, शहरी दळणवळण विभाग.

# आरटीओ कर्मचाऱ्यांचा बेमुदत उपोषणाचा इशारा

## विविध मागण्या मान्य न झाल्यास सोमवारपासून साखळी आंदोलन

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: प्रादेशिक परिवहन कार्यालयातील (आरटीओ) कर्मचारी संघटनांनी जुन्या मागण्या पूर्ण न झाल्यास येत्या २७ ऑक्टोबरपासून बेमुदत साखळी उपोषणाचा इशारा दिला आहे. रिक्त पदे भरणे, पदोन्नती देणे आणि कळसकर समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी, अशा कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्या आहेत. आहे.**



राज्यातील ५९ प्रादेशिक आणि उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये वर्ग तीन आणि चारमधील हजारो कर्मचारी कार्यरत आहेत. मात्र, नवीन नोकरभरती न झाल्याने कार्यालयीन अधीक्षक (१२०), प्रशासकीय अधिकारी (७५), सहायक मोटार वाहन अभियोक्ता (१४), निम्नश्रेणी लघुलेखक (१६), वरिष्ठ लिपिक (१०) आणि कनिष्ठ लिपिक (२८) अशी अनेक पदे रिक्त आहेत. २०१८ पासून रिक्त पदे भरण्याची मागणीच केलेली नाही. याशिवाय, सेवा प्रवेश नियमांबाबत गेल्या तीन वर्षांपासून शासनाकडे निर्णय रखडला आहे.

रिक्त पदे; कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण रिक्त पदांमुळे कार्यरत कर्मचाऱ्यांवर प्रचंड कामाचा ताण येत आहे. पदोन्नती रखडल्याने कर्मचाऱ्यांचे मनोधैर्यही खचत आहे. कर्मचारी संघटनांनी यापूर्वी १० ऑक्टोबर रोजी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेऊन मागण्यांचा पाठपुरावा केला होता. त्यावेळी मंत्र्यांनी आठवड्याभरात कार्यवाहीचे आश्वासन दिले होते. मात्र, परिवहन आयुक्तांकडून कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. असे कर्मचारी म्हणत आहेत.

" परिवहन मंत्र्यांशी चर्चेनंतर परिवहन आयुक्तांनी सकारात्मक भूमिका घेतल्याचे सांगितले. पण, प्रत्यक्षात कोणतीही प्रगती दिसत नाही. आता आम्ही २७ ऑक्टोबरपासून साखळी उपोषणाला सुरुवात करणार आहेत.

**-सुरेंद्र सरतापे,** सरचिटणीस, आरटीओ कर्मचारी संघटना




# बदल घडवण्याची संधी गमावली...

**सतराव्या लोकसभेच्या अखेरच्या अधिवेशनात नवे गुन्हेगारी कायदे वा 'संहिता' घाईने मंजूर करून घेण्यात आल्या, तेव्हा राज्यसभेत या विषयावर प्रमुख वक्ता म्हणून मी तयार होतो; मात्र विरोधी बाकांवरील तब्बल १४६ सदस्यांना निलंबित केले गेल्याचा निषेध नोंदवणे महत्त्वाचे मानून मी माझे तयार भाषण संसदेत न करता एका इंग्रजी वृत्तपत्रास (२५ डिसेंबर २०२३ रोजीचा) लेख म्हणून दिले होते.**



पहिला मुद्दा असा की, अतिघाईने आणलेल्या या तीन संहितांमध्ये बऱ्याच सुधारणा कराव्या लागतील, संसदेत दुरुस्त्या मांडाव्या लागतील. टाळली गेलेली चर्चा त्यानिमित्ताने घडेल आणि याचा फायदाच आपल्या कायद्यांना होईल, पण अर्थात अशा सुधारणा आता मांडण्याइतका विनय आणि हिंमतसुद्धा सत्ताधाऱ्यांकडे हवी. हे गुण सत्ताधारी दाखवत नाहीत, तोवर हे दिवास्वप्नच राहणार.दुसरा मुद्दा म्हणजे- काहीतरी केल्यासारखे नुसते दाखवायचे, वरवरचे बदल करायचे आणि मूलभूत विचार करून संरचनात्मक बदल घडवण्याची तोशीस घ्यायचीच नाही हे सध्याच्या सत्ताधाऱ्यांनी याआधी दाखवलेले अवगुण. त्यांचा दुष्प्रभाव तीन संहितांतही दिसून येतोच. तो कसा हे उदाहरणाने पाहू. 'भारतीय दंड विधाना'तील मूळच्या ५११ पैकी १७५ (३४.२४ टक्के) तरतुदीच भारतीय न्याय संहितेत थोड्याफार आणि त्याही वरवर बदलल्या गेल्या, त्यात २२ तरतुदी वगळल्या गेल्या आणि आठ तरतुदी नव्याने समाविष्ट झाल्या; दंड विधानाच्या दुसऱ्या प्रकरणात ४८ तरतुदींबाबतची जी स्पष्टीकरणे होती त्यांनाही फाटा देऊन भारतीय न्याय संहितेच्या पहिल्या प्रकरणातील अवघ्या तीन कलमांत सारी स्पष्टीकरणे कोंबण्यात आली; दंड विधानाचे प्रकरण १७ हे न्याय संहितेतही त्याच क्रमांकाचे असले तरी त्यात 'मालमत्ताविषयक गुन्हे'साठी जी मूळची ८४ कलमे होती ती खोडून फक्त ३१ कलमे आता उरली आहेत; हे सगळे या '१७५ बदलां'मध्ये मोजलेले आहे... पण 'भारतीय न्याय संहिते'त 'भादंवि'ऐवजी खरा नवा बदल म्हणाल तर तो फक्त आठच कलमांपुरता आहे. तिसरा मुद्दा 'वसाहतवादी कायदे आम्हीच बदलले' वगैरे दावे करून जणू क्रांतीच केल्याचा भास उत्पन्न करणाऱ्या राजकारणाचा फोलपणा उघड करणारा... ब्रिटिशांनी त्यांच्या सोयीसाठी आणलेली 'राजद्रोहा'ची तरतूद भारतीय दंड विधानात (कलम १२५) होती आणि तिला भारतीय न्याय संहितेच्या कलम १५२ मुळे तर अधिकच मोघम आणि सरकारधार्जिणे स्वरूप आल्याने नव्या संहितेने जणू लॉर्ड मेकॉलेला मुजराच केला आहे. एकंदर राजद्रोहाला देशद्रोहाचे स्वरूप आणून न थांबता, त्याची शिक्षाही नवी 'न्याय' संहिता तीनऐवजी सात वर्षे करते... तेसुद्धा, साक्षात सर्वोच्च न्यायालयापुढे भारताच्या महान्यायवादींनी (ॲटर्नी जनरल) मे २०२२ आणि पुन्हा ऑक्टोबर २०२२ मध्ये 'सरकार या कलमाचा साद्यंत फेरविचार करेल, तोवर याबाबतचे (राजद्रोह) सर्व खटले प्रलंबित ठेवू द्या' अशी विनंती केलेली असताना. म्हणजे सरकारने केवळ न्यायतत्त्वांचा नव्हे तर सर्वोच्च न्यायालयाचाही आब राखलेला नाही आणि याचा मोठा फटका तळागाळातील कार्यकर्त्यांपासून ते सत्तेला सत्याचा आरसा दाखवणाऱ्या सर्वांनाच बसणार आहे. चौथा मुद्दा 'भारतीय नागरिक सुरक्षा संहिता' या फौजदारी कायद्याऐवजी (क्रिमिनल प्रोसिजर कोड- सीआरपीसी) आणलेल्या संहितेतील कलम १८७ साठी केंद्रीय गृहमंत्र्यांनी दिलेल्या स्पष्टीकरणाबद्दल. '६० ते ९० दिवस (पोलीस) कोठडी'च्या मुदतीची ही तरतूद 'सलग इतके दिवस नव्हे, तर आरोपीला न्यायालयापुढे सादर केल्यानंतरच्या ४० ते ६० दिवसांत कधीही (आरोपपत्र दाखल करण्याची मुदत ६० दिवस आहे की ९० यावर अवलंबून) टप्प्याटप्प्याने, पण जास्तीत जास्त १५ दिवसांचीच पोलीस कोठडी' अशी असल्याचे गृहमंत्री म्हणतात. पण यातून आरोपीच्या छळाची शक्यता प्रचंड वाढतात... संशयित आरोपीला पोलीस एका आठवड्यात तीन दिवस, दुसऱ्या आठवड्यात पुन्हा दोन दिवस अशा प्रकारे कोठडीत ठेवू शकतात, त्यातून प्रत्यक्ष आणि संभाव्य छळ अधिक करता येईल. मुळात एखाद्याला संशयावरून अटक होते तीच जर 'संशयाला भक्कम पुष्टी देणारे पुरावे हाती आल्यानंतर', तर मग वारंवार कोठडीत घेतले जाण्याच्या टांगत्या तलवारीची व त्यातून येणाऱ्या अशाश्वतीची गरजच काय?

## प्रासंगिक »

### अवकाशाचे आवाहन

***भारताच्या अवकाशविज्ञान क्षेत्राचे क्षितिज विस्तारणारे शास्त्रज्ञ एकनाथ वसंत तथा ई. व्ही. चिटणीस यांचे काम हा भारताच्या विज्ञान प्रगतीच्या इतिहासाचा दस्तावेजच***

आपल्याकडे विज्ञानाबाबतही सगळा वलयाचा मामला. ज्याच्या नावे एकही संशोधन नाही असे, केवळ भाभा अणुसंशोधन केंद्रातील चाकरीची पुण्याई असणारे आणि काही तर केवळ विज्ञानकथा सांगणारे... अशा सगळ्यांनाच येथे वैज्ञानिक म्हटले जाते. कोणालाही विचारवंत असा किताब द्यावा तसेच हे. आणि सध्याचा काळ तर काही सेकंदांच्या 'रील'मध्ये मावणाऱ्या कर्तृत्वाला नमन करण्याचा. एखाद्या वाक्याच्या वा मोजक्या शब्दांच्या आत्मचरित्रात विरून जाणाऱ्या 'स्टोरी'इतके भागधेय उरणे, हा केवळ त्या व्यक्तीवर तर अन्याय आहेच; पण तो व्यक्तीला तेवढ्यातच बंदिस्त करणाऱ्यांचा करंटेपणाही. अर्थात, शतायुषी शास्त्रज्ञ एकनाथ वसंत तथा ई. व्ही. चिटणीस यांना तर निधनानंतर एवढेही भाग्य अपवादानेच मिळाले असेल.

शहराचा विस्तार आणि लोकसंख्या वाढत असताना काही वर्षांपूर्वी एक सर्वेक्षण करण्यात आले. त्यामध्ये शहराला भेडसाविणारी प्रमुख समस्या कोणती, असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर सहाजिकच वाहतूक कोंडी आणि सक्षम सार्वजनिक वाहतूक सुविधेचा अभाव, असेच उत्तर पुढे आले.

# पीएमपी, बीआरटीची रडकथा...

अलीकडच्या पाच ते दहा वर्षांत पीएमपी सक्षमीकरणासंदर्भात सातत्याने चर्चा झाली आणि होत आहे. प्रत्यक्षात पीएमपीचे सक्षमीकरण कागदावरच राहिले आहे. पीएमपीमधील अधिकारी आणि राज्यकर्त्यांमध्ये पीएमपी 'आपली' आहे, ही मानसिकता निर्माण होत नाही तोपर्यंत पीएमपीची रडकथा कायम राहणार आहे.कोणत्याही शहरातील सार्वजनिक वाहतूक यंत्रणा नेहमी तोट्यात असते, हे वास्तव आहे. शहरातील वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी आणि पुणे तसेच पिंपरी-चिंचवडमधील बारा लाखांपेक्षा जास्त प्रवाशांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी सतरा वर्षांपूर्वी या दोन्ही महापालिकेतील परिवहन उपक्रमांचे एकत्रीकरण करून पीएमपी ही स्वतंत्र संस्था स्थापन करण्यात आली. मेट्रो, पीएमपी, उच्च क्षमता वर्तुळाकार मार्ग, बीआरटी हे सार्वजनिक वाहतुकीचे प्रमुख घटक आहेत. मात्र गाड्या खरेदीतील दफ्तर दिरंगाई, निविदा



प्रक्रियेतील अनियमितता आणि गैरव्यवहार, थांब्यांची दुरवस्था, अरेरावीपणा आणि अनास्था अशा अनेक गोष्टी पीएमपीच्या रडकथेला हातभार लावत आहेत. पीएमपीच्या सुधारणेचा विषय निघाला की, आर्थिक तुटीचे कारण आपसूक पुढे येते. तो तोटाही महापालिकांकडून भरून काढला जातो. पण कामगिरीत सुधारणाच दिसत नाही.हीच अवस्था बीआरटीची. देशातील पहिला बीआरटी मार्ग प्रायोगिक तत्त्वावर पुण्यात सुरू करण्यात आला. पण बीआरटी मार्ग कुठे आहे, असा प्रश्न विचारण्याची वेळ प्रवाशांवर आली आहे. बीआरटी मार्गात सुधारणेच्या नावाखाली असंख्य बदल आणि प्रयोग करण्यात आले. पण ते उपयुक्त ठरलेच नाहीत. उलट, बीआरटी मार्गांमुळे वाहतूक कोंडी होत असल्याचे कारण देत बीआरटी मार्गावरच हातोडा टाकण्याचे काम महापालिका प्रशासन, माजी नगरसेवक आणि पीएमपीच्या अधिकाऱ्यांनी मिळून केले आहे. त्यामुळे बीआरटी सध्या मृत्युशय्येवर आहे.सार्वजनिक वाहतूक सुविधांच्या सक्षमीकरणाच्या निव्वळ गप्पा किंवा कागदोपत्री आराखडे करून चालणार नाही, त्याची काटेकोर अंमलबजावणी करावी लागेल, याकडे कोणीही लक्ष देत नाही. त्यामुळे बैठका, प्रस्ताव यातच सुधारणा अडकली आहे. मेट्रो, बीआरटी, पीएमपी या आणि अन्य सार्वजनिक वाहतूक सेवांची सांगड मेट्रोबरोबर घालावी लागणार आहे, तरच शाश्वत वाहतूक व्यवस्था शहरात निर्माण होईल. प्रवाशांना पायाभूत सुविधा देणे, खासगी आणि सार्वजनिक वाहतूक सेवांमध्ये समन्वय साधल्यास पुण्यातील प्रवास सुखकर होणार आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## संघटना आंदोलन काढणार

## शेतकऱ्यांचा सातबारा सरसकट कोरा करा

# हे पॅकेज म्हणजे शुद्ध फसवणूक!

## हिवाळी अधिवेशनावर भव्य आंदोलन



।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी अतिवृष्टीग्रस्तांसाठी जाहीर केलेले ३१ हजार कोटी रुपयांचे पॅकेज ही शुद्ध फसवणूक असून, शेतकऱ्यांच्या हाती अतिशय तुटपुंजी रक्कम पडणार आहे. अशा तकलादू उपाययोजना करण्याऐवजी आश्वासन दिल्याप्रमाणे शेतकऱ्यांचा सरसकट सातबारा कोरा करण्यात यावा, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते तथा माजी खासदार राजू शेट्टी यांनी येथे केली.**

शेट्टी हे शनिवारी (दि. २५) जिल्हा दौऱ्यावर आले असता येथील शासकीय विश्रामगृहावर आयोजित पत्रकार बैठकीत त्यांनी संवाद साधला. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष किशोर ढगे व पदाधिकारी उपस्थित होते. यंदा राज्यात सर्वदूर अतिवृष्टी होऊन पिके पाण्याखाली गेल्याने शेतकरी हवालदील झाला आहे. राज्य शासनाने ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना मदत देण्यात यावी, असे ते म्हणाले.महायुती सरकारने निवडणुकीदरम्यान शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते. दिलेले आश्वासन पाळून सरकारने शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा, या प्रमुख मागणीसाठी येत्या हिवाळी अधिवेशनावर राज्यातील सर्व शेतकरी संघटना मिळून आंदोलन काढणार असल्याचेही यावेळी शेट्टी यांनी जाहीर केले. हमीभावापेक्षा कमी दरात शेतकऱ्यांना सोयाबीन विकावे लागत आहे.अजून शासनाची खरेदी केंद्रे सुरू झाली नाहीत. व्यापारीच सोयाबीनची खरेदी करून साठेबाजी करतील. खरेदी केंद्रावर व्यापाऱ्यांचेच सोयाबीन घातले जाईल, असे ते म्हणाले. तसेच मराठवाड्यातील साखर कारखान्यांनी ऊस उत्पादकांना किमान ३ हजार ३०० रुपये प्रति टन दर देण्याचे आवाहन राजू शेट्टी यांनी केले. यावेळी शेट्टी यांनी सरकारच्या दुष्काळ पॅकेजवरही तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले सरकारने जाहीर केलेले ३१ हजार कोटींचे पॅकेज फसवे आणि आकड्यांचा खेळ आहे. त्यातील निधीचा मोठा भाग रोजगार हमी योजनेत गेला आहे.

दोन वर्षांपासून शेतकऱ्यांनी विहिरी काढल्या, पाणंद रस्ते केले मात्र पैसे मिळाले नाहीत. अशा स्थितीत रोजगार हमीच्याद्वारे होणाऱ्या कामांचे पैसे लवकर मिळतील, याची खात्री नाही. थेट शेतकऱ्यांना मदत देण्याऐवजी सरकार बाकीच्याच गोष्टी करू लागले आहे, असेही ते म्हणाले. यंदा राज्यात सर्वदूर अतिवृष्टी होऊन पिके पाण्याखाली गेल्याने शेतकरी हवालदील झाला आहे. राज्य शासनाने ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना मदत देण्यात यावी, असे ते म्हणाले. शेट्टी हे शनिवारी (दि. २५) जिल्हा दौऱ्यावर आले असता येथील शासकीय विश्रामगृहावर आयोजित पत्रकार बैठकीत त्यांनी संवाद साधला. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष किशोर ढगे व पदाधिकारी उपस्थित होते. यंदा राज्यात सर्वदूर अतिवृष्टी होऊन पिके पाण्याखाली गेल्याने शेतकरी हवालदील झाला आहे. राज्य शासनाने ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना मदत देण्यात यावी, असे ते म्हणाले.महायुती सरकारने निवडणुकीदरम्यान शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते. दिलेले आश्वासन पाळून सरकारने शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा, या प्रमुख मागणीसाठी येत्या हिवाळी अधिवेशनावर राज्यातील सर्व शेतकरी संघटना मिळून आंदोलन काढणार असल्याचेही यावेळी शेट्टी यांनी जाहीर केले. हमीभावापेक्षा कमी दरात शेतकऱ्यांना सोयाबीन विकावे लागत आहे.अजून शासनाची खरेदी केंद्रे सुरू झाली नाहीत.

### शेतकरी हवालदील झाला

खरेदी केंद्रावर व्यापाऱ्यांचेच सोयाबीन घातले जाईल, असे ते म्हणाले. तसेच मराठवाड्यातील साखर कारखान्यांनी ऊस उत्पादकांना किमान ३ हजार ३०० रुपये प्रति टन दर देण्याचे आवाहन राजू शेट्टी यांनी केले.यावेळी शेट्टी यांनी सरकारच्या दुष्काळ पॅकेजवरही तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले सरकारने जाहीर केलेले ३१ हजार कोटींचे पॅकेज फसवे आणि आकड्यांचा खेळ आहे.दोन वर्षांपासून शेतकऱ्यांनी विहिरी काढल्या, पाणंद रस्ते केले मात्र पैसे मिळाले नाहीत.

# बंजारा आरक्षणासाठीचा लढा थांबला!

## जालना येथील उपोषण नवव्या दिवशी मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनानंतर मागे

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील बंजारा समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये (एस.टी.) समावेश करावा, या मागणीसाठी जालना शहरातील अंबड चौफुली परिसरात सुरू केलेले बेमुदत उपोषण विजय चव्हाण यांनी शनिवारी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी भ्रमणध्वनीवर झालेल्या चर्चेनंतर नवव्या दिवशी मागे घेतले.**

मंत्री संजय राठोड, पालकमंत्री पंकजा मुंडे, आमदार अर्जुन खोतकर यांनी शनिवारी उपोषणस्थळी विजय चव्हाण यांची भेट घेऊन चर्चा केली. त्यानंतर त्यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी भ्रमणध्वनीवरून बोलणे करवून दिले. यानंतर चव्हाण यांनी उपोषण मागे घेतले. मुख्यमंत्र्यांनी चव्हाण आणि त्यांच्या शिष्टमंडळास चर्चेसाठी बोलावले असल्याचे आमदार खोतकर यांनी सांगितले.परवानगी मिळाली नाही म्हणून चव्हाण यांनी पहिल्या दिवशी झाडावर उपोषण सुरू केले होते. दिवाळीच्या कालावधीतही त्यांचे उपोषण सुरूच होते. अनेक बंजारा समाज बांधवांनी दिवाळी आणि गोवर्धनपूजाही उपोषणाच्या ठिकाणीच केली.

या काळात बंजारा समाजातील महिलांनी रस्त्यावर



स्वयंपाक करून मोर्चाही काढला होता. हैदराबाद गॅझेटिअर आणि सी.पी. बेरार करारानुसार बंजारा समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये (एस.टी.) समावेश करावा, या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात आले.राज्यातील बंजारा समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये (एस.टी.) समावेश करावा, या मागणीसाठी जालना शहरातील अंबड चौफुली परिसरात सुरू केलेले बेमुदत उपोषण विजय चव्हाण यांनी शनिवारी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी भ्रमणध्वनीवर झालेल्या चर्चेनंतर नवव्या दिवशी मागे घेतले मंत्री संजय राठोड, पालकमंत्री पंकजा मुंडे, आमदार अर्जुन खोतकर यांनी शनिवारी उपोषणस्थळी विजय चव्हाण यांची भेट घेऊन चर्चा केली. त्यानंतर त्यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी भ्रमणध्वनीवरून बोलणे करवून दिले.

यानंतर चव्हाण यांनी उपोषण मागे घेतले. मुख्यमंत्र्यांनी चव्हाण आणि त्यांच्या शिष्टमंडळास चर्चेसाठी बोलावले असल्याचे आमदार खोतकर यांनी सांगितले. परवानगी मिळाली नाही म्हणून चव्हाण यांनी पहिल्या दिवशी झाडावर उपोषण सुरू केले होते. दिवाळीच्या कालावधीतही त्यांचे उपोषण सुरूच होते.

### आश्वासनानंतर उपोषण मागे

दिवाळी आणि गोवर्धनपूजाही उपोषणाच्या ठिकाणीच केली. या काळात बंजारा समाजातील महिलांनी रस्त्यावर स्वयंपाक करून मोर्चाही काढला होता. हैदराबाद गॅझेटिअर आणि सी.पी. बेरार करारानुसार बंजारा समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये (एस. टी.) समावेश करावा, या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात आले.

## महागठबंधनला मतदान करा

## समाजवादी पक्षाच्या खासदारांचं अजब विधान

# लोकांनी आम्हाला हुंड्यात मत द्यावं!

### अर्ध्याहून अधिक मुले बिनलग्नाची

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**समाजवादी पक्षाचे नेते आणि उत्तर प्रदेशमधील बलिया लोकसभेचे खासदार सनातन पांडे यांनी बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अजब विधान केले आहे. उत्तर प्रदेश आणि बिहार या दोन राज्यातील जुन्या सामाजिक आणि सांस्कृतिक संबंधाचा हवाला देत उत्तर प्रदेशच्या सीमेवर राहणाऱ्या मतदारांनी महागठबंधनला मतदान करावे, असे ते म्हणाले. बिहारच्या निवडणुकीत या लोकांनी हुंड्यात मतदान द्यावे, असे ते म्हणाले आहेत.**



माध्यमांशी संवाद साधत असताना सनातन पांडे म्हणाले, बिहार उत्तर प्रदेशसाठी खास आहे. बिहारमधील छपरा, आरा आणि सिवान सारखे जिल्हे नसते तर आमच्या (उत्तर प्रदेश) येथील अर्ध्याहून अधिक मुले बिनलग्नाची राहिली असती.आमचे बिहारशी रोटी-बेटीचे संबंध आहेत, असा सामाजिक संदर्भ पांडे यांनी दिला. बिहारींशी आमची सोयरीक असल्यामुळे बलियाचे आम्ही लोक हुंड्यात मत मागत आहोत. हुंडा म्हणून आम्हाला तुमचे मत द्या आणि राज्यात महागठबंधनचे सरकार स्थापन करण्यासाठी मदत करा, असे आवाहन पांडे यांनी केले.समाजवादी पक्षाचे नेते पुढे म्हणाले, बिहारमधील भाजपाचे कार्यकर्ते, नेते त्यांच्या त्यांच्या पक्षात राहूनही आपल्या जुन्या संबंधांना जागून तेही महागठबंधनला मतदान करू शकतात. मी जर छपरा येथे गेलो तर तर तिथले प्रख्यात वकील अवधेश सिंह जे भाजपाचे सदस्य आहेत. ते मला भाजपाच येण्याचे आवाहन करतात.मी त्यांना हुंड्यात महागठबंधनला मतदान देण्याची विनंती करेन.महागठबंधनने आरजेडीचे नेते तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रीपदाचा चेहरा म्हणून जाहिर केले आहे. सनातन पांडे यांनी तेजस्वी यादव यांचेही तोंडभरून कौतुक केले. ते म्हणाले, तेजस्वी यादव उपमुख्यमंत्री असताना त्यांनी सरकारी नोकरभरती केली. यामुळे बिहार आणि उत्तर प्रदेश या दोन्ही राज्यातील लोकांचा फायदा झाला. “तेजस्वी यादव यांनी पाच लाख लोकांना रोजगार दिला. यामुळी यूपीतील वाराणसी, बलिया, चंदौली यासारख्या जिल्ह्यातील तरूणांना मोठा लाभ मिळाला.

उत्तर प्रदेशमधील तरूण जर बिहारच्या बूथवर असतील तर तेही तेजस्वी यादव यांनाच मतदान करतील”, असेही सनातन पांडे म्हणाले.माध्यमांशी संवाद साधत असताना सनातन पांडे म्हणाले,

### सांस्कृतिक संबंधाचा हवाला

उत्तर प्रदेशमधील तरूण जर बिहारच्या बूथवर असतील तर तेही तेजस्वी यादव यांनाच मतदान करतील”, असेही सनातन पांडे म्हणाले.समाजवादी पक्षाचे नेते आणि उत्तर प्रदेशमधील बलिया लोकसभेचे खासदार सनातन पांडे यांनी बिहारउत्तर प्रदेश आणि बिहार या दोन राज्यातील जुन्या सामाजिक आणि सांस्कृतिक संबंधाचा हवाला देत उत्तर प्रदेशच्या सीमेवर राहणाऱ्या मतदारांनी महागठबंधनला मतदान करावे.

बिहार उत्तर प्रदेशसाठी खास आहे. बिहारमधील छपरा, आरा आणि सिवान सारखे जिल्हे नसते तर आमच्या (उत्तर प्रदेश) येथील अर्ध्याहून अधिक मुले बिनलग्नाची राहिली असती.आमचे बिहारशी रोटी-बेटीचे संबंध आहेत, असा सामाजिक संदर्भ पांडे यांनी दिला. बिहारींशी आमची सोयरीक असल्यामुळे बलियाचे आम्ही लोक हुंड्यात मत मागत आहोत. हुंडा म्हणून आम्हाला तुमचे मत द्या आणि राज्यात महागठबंधनचे सरकार स्थापन करण्यासाठी मदत करा, असे आवाहन पांडे यांनी केले.समाजवादी पक्षाचे नेते पुढे म्हणाले, बिहारमधील भाजपाचे कार्यकर्ते, नेते त्यांच्या त्यांच्या पक्षात राहूनही आपल्या जुन्या संबंधांना जागून तेही महागठबंधनला मतदान करू शकतात. मी जर छपरा येथे गेलो तर तर तिथले प्रख्यात वकील अवधेश सिंह जे भाजपाचे सदस्य आहेत. ते मला भाजपाच येण्याचे आवाहन करतात.मी त्यांना हुंड्यात महागठबंधनला मतदान देण्याची विनंती करेन.महागठबंधनने आरजेडीचे नेते तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रीपदाचा चेहरा म्हणून जाहिर केले आहे. सनातन पांडे यांनी तेजस्वी यादव यांचेही तोंडभरून कौतुक केले. ते म्हणाले, तेजस्वी यादव उपमुख्यमंत्री असताना त्यांनी सरकारी नोकरभरती केली. यामुळे बिहार आणि उत्तर प्रदेश या दोन्ही राज्यातील लोकांचा फायदा झाला. “तेजस्वी यादव यांनी पाच लाख लोकांना रोजगार दिला.

# पाकिस्तान पुन्हा FATF च्या रडारवर?


## दहशतवाद्यांच्या निधीवरून दिला कारवाईचा इशारा

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**जगभरात दहशतवाद्यांना होणाऱ्या अर्थपुरवठ्यावर नजर ठेवणारी संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्स अर्थात एफएटीएफने पुन्हा एकदा पाकिस्तानला कडक शब्दांत फटकारलं आहे. एफएटीएफच्या अध्यक्षांनी फ्रान्समध्ये पत्रकार परिषदेत बोलताना या संदर्भात भाष्य केलं आहे.**

‘ऑक्टोबर २०२२ मध्ये पाकिस्तानला ग्रे लिस्टमधून काढून टाकणं हा दहशतवादी वित्तपुरवठा आणि मनी लाँड्रिंग कारवायांविरुद्ध एक मजबूत संरक्षण नाही’, असा इशारा एफएटीएफने दिला आहे. त्यामुळे एफएटीएफ पुन्हा पाकिस्तानवर कारवाई करण्याची शक्यता वर्तवली जात आहे.एफएटीएफने पाकिस्तानला इशारा देताना म्हटलं की, ‘ग्रे लिस्टमधून काढून टाकण्याचा अर्थ दहशतवादाला निधी देण्यापासून सूट मिळणे असा होत नाही. पाकिस्तानसारख्या देशांनी अधिक सतर्क आणि वचनबद्ध राहिलं पाहिजे.’ तसेच यावर एफएटीएफची सतत देखरेख सुरू राहणार असल्याचा इशाराही यावेळी देण्यात आला





आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.FATF अर्थात FINANCIAL ACTION TASK FORCE ही संस्था एक अशी यंत्रणा नियंत्रित करते, ज्याद्वारे जगभरात अव्याहतपणे वाहणारा पैसा दहशतवादी कारवायांसाठी वापरला जाण्यापासून रोखला जातो. आंतरराष्ट्रीय स्तरावरील आर्थिक गैरव्यवहार, दहशतवादी कारवायांना अर्थपुरवठा आणि आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेला असणाऱ्या धोक्यांपासून बचाव करण्यासाठी आवश्यक

### पाकिस्तानवर कारवाईची शक्यता

‘ऑक्टोबर २०२२ मध्ये पाकिस्तानला ग्रे लिस्टमधून काढून टाकणं हा दहशतवादी वित्तपुरवठा आणि मनी लाँड्रिंग कारवायांविरुद्ध एक मजबूत संरक्षण नाही’, असा इशारा एफएटीएफने दिला आहे. त्यामुळे एफएटीएफ पुन्हा पाकिस्तानवर कारवाई करण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

असणाऱ्या इतर सर्व बाबींवर ही संस्था नजर ठेवून असते. त्यासंदर्भात इतर देशांसाठी आवश्यक ते नियम, मार्गदर्शक सूची आणि अंमलबजावणीचे निर्देश या संस्थेमार्फत नमूद केले जातात.ग्रे लिस्ट म्हणजे नेमकं काय? FATF ही ‘ग्रे लिस्ट’ तयार करते. FATF च्या मते जे देश आंतरराष्ट्रीय आर्थिक गैरव्यवहार रोखण्यात सातत्याने अपयशी ठरतात, दहशतवादी कारवायांना होणारा अर्थपुरवठा रोखू शकत नाहीत आणि त्यामुळेच जागतिक स्तरावर सातत्याने टीकेचे धनी ठरतात, अशा देशांचा या यादीत समावेश केला जातो. पण पाकिस्तानला या यादीतून काढल्यानंतर अजूनही तब्बल २३ देश या यादीत आहेत!

# प्रियांका चोप्रा-निक जोनासला सोडावं लागलं लॉसमधील घर

अभिनेत्री प्रियांका चोप्रा पती निक जोनास आणि मुलीसह लॉस एंजेलिसमध्ये राहते. पण तिला तिचं आलिशान घर सोडावं लागलं आहे. हे घर आता राहण्यायोग्य नाही. घरात पाणी गळतीमुळे बुरशी लागली आहे. बुरशी आरोग्यासाठी हानिकारक आहे, त्यामुळे घराची दुरुस्ती होईपर्यंत त्यांनी हे घर सोडलं आहे. हे जोडपं आता घराच्या जुन्या मालकाविरोधात कायदेशीर लढाई लढत असल्याचं म्हटलं जात आहे. पेज सिक्सच्या वृत्तानुसार, घरात ज्या काही समस्या आहेत, त्या आरोग्याच्या दृष्टिने चांगल्या नाहीत. प्रियांका आणि निक यांनी पाच वर्षांपूर्वी २०१९ मध्ये हे आलिशान घर २० मिलियन डॉलर्समध्ये खरेदी केले होते. या घरामध्ये सात बेडरूम, नऊ बाथरूम, टेम्प्रेचर कंट्रोल वाइन सेलर, किचन, होम थिएटर, बॉलिंग अॅली, स्पा आणि स्टीम शॉवर, जिम आणि एक बिलियर्ड्स रूम आहे.मे २०२३ मध्ये प्रियांका व निकने कायदेशीर खटला दाखल केलाय, असं म्हटलं जात आहे. अहवालानुसार, घर खरेदी केल्यानंतर काही दिवसांतच पूल आणि



स्पामध्ये समस्या दिसू लागल्या होत्या. वॉटरप्रूफिंग नसल्यामुळे घराच्या अनेक भागात बुरशी वाढू लागली, तसंच बारबेक्यूमध्येही पाणी गळत होतं, असं तक्रारीत म्हटलं आहे.प्रियांका चोप्रा आणि निक जोनास यांना त्यांच्या नुकसान भरपाई हवी आहे. या घराच्या दुरुस्तीसाठी जोनास दाम्पत्याने केलेला खर्च त्यांना घराच्या जुन्या मालकाकडून पाहिजे आहे. घराच्या दुरुस्तीत आतापर्यंत १५ मिलियन डॉलर्सहून अधिक खर्च झाला आहे. या घराची दुरुस्ती होईपर्यंत प्रियांका व निक आपल्या मुलीसह दुसरीकडे राहतील.अभिनेत्री प्रियांका चोप्रा पती निक जोनास आणि मुलीसह लॉस एंजेलिसमध्ये राहते. पण तिला तिचं आलिशान घर सोडावं लागलं आहे. हे घर आता राहण्यायोग्य नाही. घरात पाणी गळतीमुळे बुरशी लागली आहे. बुरशी आरोग्यासाठी हानिकारक आहे, त्यामुळे घराची दुरुस्ती होईपर्यंत त्यांनी हे घर सोडलं आहे. हे जोडपं आता घराच्या जुन्या मालकाविरोधात कायदेशीर लढाई लढत असल्याचं म्हटलं जात आहे. पेज सिक्सच्या वृत्तानुसार, घरात ज्या काही समस्या आहेत, त्या आरोग्याच्या दृष्टिने चांगल्या नाहीत.

## शिल्पाचा 'या' पुरस्काराने गौरव

अभिनेत्री शिल्पा शेट्टी सोशल मीडियावर खूप सक्रिय आहे. तीन दशकांहून अधिक काळापासून आपल्या अभिनयाने प्रेक्षकांचं मनोरंजन करणारी शिल्पा उत्तम डान्सरही आहे. छोट्या पडद्यावरील अनेक रिॲलिटी शोची परीक्षक म्हणून ती काम करते. अभिनयाबरोबरच ती तिच्या फिटनेससाठी खूप लोकप्रिय आहे. नुकतीच ती रोहित शेट्टीच्या 'इंडियन पोलीस फोर्स' या वेब सिरीजमध्ये झळकली. आता शिल्पाला एक पुरस्कार मिळाला आहे, तिनेच पोस्ट करून याबाबत माहिती दिली आहे. 'चॅम्पियन्स ऑफ चेंज' हा पुरस्कार समाज सेवा, सामाजिक विकास, शिक्षण, नवनवीन उपक्रम, क्रीडा आणि संस्कृती या क्षेत्रात काम करणाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी दिला जातो. कला क्षेत्रातील योगदानासाठी 'चॅम्पियन्स ऑफ चेंज २०२३' हा पुरस्कार शिल्पा शेट्टी कुंद्राला देण्यात आला आहे.शिल्पा शेट्टीला गौरविण्यासाठी व्यासपीठावर आमंत्रित करण्यात आलं, तेव्हा सूत्रसंचालकाने तिच्या कला क्षेत्रातील कामगिरी सांगितली. "शिल्पा शेट्टी कुंद्रा तुम्ही एक प्रतिष्ठीत भारतीय अभिनेत्री आणि योग विद्येत पारंगत आहात. कला आणि कलाकाराला कोणतेही वय आणि सीमा नसते.

## सलमानसोबत दिसणार 'त्रिशा'!



साऊथमधील प्रसिद्ध अभिनेत्री म्हणून त्रिशाची ओळख आहे. तिचा चाहतावर्गही मोठा आहे. सोशल मीडियावर नेहमीच सक्रिय असणाऱ्या त्रिशाचा आणि थलपती विजयचा लिओ नावाचा चित्रपट प्रदर्शित झाला होता. त्यालाही प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. आता मिळालेल्या माहितीनुसार, त्रिशा ही तब्बल तेरा वर्षांच्या ब्रेकनंतर बॉलीवूडमध्ये इंट्री करणार असल्याची माहिती आहे. साऊथमधील सर्वाधिक पॉप्युलर आणि मानधन घेणारी अभिनेत्री म्हणूनही त्रिशाचे नाव घेतले जाते. काही दिवसांपूर्वी एका वेगळ्या प्रकरणामुळे ती चर्चेत आली होती. तिच्या सहकारी कलाकारानं मन्सूर अली खाननं तिच्यावर आक्षेपार्ह टिप्पणी केली होती. त्यामुळे त्रिशानं थेट कोर्टात धाव घेतली होती. कोर्टानं देखील मन्सूरला चांगलेच फटकारले होते. या सगळ्यात त्रिशानं मन्सुरनंही माफी मागितल्याचे दिसून आले आहे. १३ वर्षांच्या अंतरानं त्रिशा बॉलीवूडमध्ये चमकणार आहे. मीडिया रिपोर्टनुसार, त्रिशा ही विष्णु वर्धन यांची पुढील फिल्म ती मुख्य भूमिकेत दिसणार आहे. त्या चित्रपटामध्ये ती चक्क सलमान खानसोबत दिसणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. अजुन या चित्रपटाची अधिकृतपणे घोषणा झालेली नाही. मात्र ती लवकरच होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्रिशाच्या भूमिकेविषयी सांगायचे झाल्यास तिच्या गेल्या काही चित्रपटांना प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. त्यात लिओचा मोठा वाटा आहे. तिच्या चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवरही मोठी कमाई केली होती. २०१० मध्ये त्रिशानं अक्षय कुमारच्या खट्टा मिठा मध्ये काम केले होते. एका राजकीय विषयावर आधारित हा चित्रपट होता. त्यातील तिच्या भूमिकेचे कौतुकही झाले होते. सध्या त्रिशाच्या आगामी प्रोजेक्टविषयी सांगायचे झाल्यास, ती विदामुयार्ची नावाच्या तमिळ चित्रपटामध्ये दिसणार आहे. मल्याळम चित्रपट आयडेंटीटी नावाच्या चित्रपटातही तिची महत्वाची भूमिका आहे. त्यानंतर ती मणिरत्नम यांच्या ठग लाईफ नावाच्या चित्रपटामध्ये झळकणार आहे. कोर्टानं देखील मन्सूरला चांगलेच फटकारले होते. या सगळ्यात त्रिशानं मन्सुरनंही माफी मागितल्याचे दिसून आले आहे.

## प्रियांकाची 'ही' बहीण चढणार बोहल्यावर!

देसी गर्ल प्रियांका चोप्रा हिच्या बहिणींची नेहमी चर्चा रंगलेली असते. सध्या 'बिग बॉस १७'मुळे मनारा चोप्रा चर्चेत आहे. तसंच दुसऱ्या बाजूला परिणीती चोप्राने संगीत क्षेत्रात पदार्पण केल्यामुळे चर्चा रंगली आहे. अशातच आता प्रियांकाची आणखी बहीण चर्चेत आली आहे. कारण आहे तिच लग्न. २४ सप्टेंबर २०२३ रोजी अभिनेत्री परिणीती चोप्रा मिसेज चड्ढा झाली. तिने आम आदमी पक्षाचे खासदार राघव चड्ढा यांच्याबरोबर लग्नगाठ बांधली. आता पुन्हा चोप्रा कुटुंबात सनई-चौघडे वाजणार आहेत. प्रियांका, परिणीतीची बहीण मीरा चोप्रा मार्चमध्ये लग्न करणार असल्याचं समोर आलं आहे. याचा खुलासा तिने स्वतः केला आहे.इस्टंट बॉलीवूड' या एंटरटेनमेंट चॅनलशी बोलताना मीरा म्हणाली, "मी लग्न करणार आहे. सध्या लग्नाची तयारी सुरु आहे. मार्चमध्ये लग्न आहे. लग्नाचं ठिकाण ठरलं आहे. राजस्थानमध्ये पारंपरिक पद्धतीने लग्न होणार आहे." त्यानंतर होणाऱ्या नवऱ्याबाबत विचारलं असता मीराने ते गुलदस्त्यात ठेवलं. पुढे मीराने म्हणाली, "लग्नासाठी प्रियंका व निक जोनस यांना आमंत्रण दिलं जाईल. जर ते कोणत्या प्रोजेक्टमध्ये व्यस्त नसतील तर ते नक्की येतील."दरम्यान, मीराच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, 'सेक्शन ३७५', 'सफेद' यांसारख्या चित्रपटात तिने काम केलं आहे. मीराने दाक्षिणात्य सिनेसृष्टीतही आपल्या अभिनयाची छाप उमटवली आहे. ती 'मरुधामलाई', 'अन्बे आरुयीरे' यांसारख्या चित्रपटात झळकली आहे.



## रश्मिका मंदानाचं विजय देवरकोंडाबद्दल विधान

लोकप्रिय अभिनेत्री रश्मिका मंदाना आणि साऊथ स्टार विजय देवरकोंडा यांच्या नात्याची खूप चर्चा होत असते. दोघेही एकमेकांसह डेटिंग करत असल्याच्या आणि रिलेशनशिपमध्ये असल्याच्या चर्चा आहेत. पण त्यांनी मात्र याबाबत अधिकृत माहिती दिलेली नाही. नुकतंच रश्मिकाला तिच्या आणि विजयच्या बॉन्डबद्दल विचारण्यात आलं तेव्हा ती त्याच्याबद्दल भरभरून बोलली. विजय तिच्या आयुष्यातला खूप मोठा आधार आहे, असंही ती म्हणाली.एका मुलाखतीत रश्मिकाला तिच्या सहकलाकारांबरोबर असलेल्या नात्याबद्दल विचारण्यात आलं. ज्यात अमिताभ बच्चन (गुडबाय), रणबीर कपूर (ॲनिमल), विजय देवरकोंडा (गीता गोविंदम, डिअर कॉम्रेड), सिद्धार्थ मल्होत्रा (मिशन मजनू) आणि अल्लू अर्जून (पुष्पा) यांच्या नावांचा समावेश होता. त्यावर रश्मिका म्हणाली, "विजू आणि मी एकत्र मोठे झालो आहोत, त्यामुळे मी माझ्या आयुष्यात जे काही करते, त्यात त्यांचंही योगदान असतं. मी त्याचा प्रत्येक गोष्टीत सल्ला घेते. मला नेहमी त्यांचं मत जाणून घ्यायचं असतं आणि तो प्रत्येक गोष्टीत मी म्हणेन ते बरोबर असं म्हणणारा नाही."पुढे रश्मिका म्हणाली, "विजय स्पष्ट बोलतो. 'हे चांगल आहे', 'हे वाईट आहे', 'मला याबद्दल असं वाटतं' असं तो सरळ सांगतो. माझ्या आयुष्यात कोणीही मला इतका पाठिंबा दिला नसेल, जितका विजयने दिला आहे.

ऑस्ट्रेलियाने टेकले गुडघे

रोहित-विराटने टीम इंडियाला मिळवून दिला विजय

# अखेरच्या वनडेत ऑस्ट्रेलियाने टेकले गुडघे

## ऑस्ट्रेलियावर ९ विकेट्सने विजय

| मुंबई |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**रोहित शर्मा आणि विराट कोहलीच्या जोडीने पुन्हा एकदा भारताला ऑस्ट्रेलियाविरूद्ध वनडे सामन्यात दणदणीत विजय मिळवून दिला आहे. रोहित-विराटने १६८ धावांची भागीदारी रचत ऑस्ट्रेलियावर ९ विकेट्सने विजय मिळवून दिला. रोहित विराट शेवटपर्यंत नाबाद राहत त्यांनी भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. ऑस्ट्रेलियाने २-१ च्या फरकाने भारताविरूद्धची वनडे मालिका आपल्या नावे केली. तर रोहित शर्मा या सामन्याचा सामनावीर आणि मालिकावीरही ठरला.**



सिडनीमध्ये खेळल्या गेलेल्या एकदिवसीय मालिकेतील शेवटच्या सामन्यात, टीम इंडियाने ऑस्ट्रेलियाचा एकतर्फी ९ विकेट्सने पराभव केला, ज्यामध्ये रोहित शर्माने शानदार शतकासह आणि विराट कोहलीने दमदार अर्धशतकासह सर्वात मोठी भूमिका बजावली. दोघांनी मिळून १६८ धावांची भागीदारी करून संघाला २३७ धावांचं लक्ष्य सहज गाठण्यास मदत केली. वेगवान गोलंदाज हर्षित राणाने शानदार गोलंदाजी केली, चार विकेट घेतल्या.रोहित शर्माने १२५ चेंडूत १३ चौकार आणि ३ षटकारांसह नाबाद १२१ धावांची खेळी केली. तर विराट कोहलीने ८१ चेंडूत ७ चौकारांसह ७४ धावा केल्या. तर शुबमन गिल २६ चेंडूत २ चौकार आणि एका षटकारासह २४ धावा करत बाद झाला. ऑस्ट्रेलियाने भारताला विजयासाठी २३७ धावांचे आव्हान दिले होते. रोहित-विराटच्या भागीदारीसह भारताने ३८.३ षटकांत २३७ धावा करत सहज विजय मिळवला.या मालिकेच्या सुरुवातीपासूनच सर्वांचे लक्ष विराट कोहली आणि रोहित शर्माच्या पुनरागमनावर होते. प्रत्येक सामन्यातील त्यांची कामगिरी सर्वाधिक चर्चेचा विषय होती. परिणामी, मालिकेच्या निकालापेक्षा दोघांच्या फलंदाजीच्या कामगिरीवर सर्वांच्या नजरा होत्या. म्हणूनच, पहिल्या दोन सामन्यांमध्ये मालिकेचा निकाल लागला असला तरी, अंतिम सामना चाहत्यांसाठी महत्त्वाचा ठरला आणि सर्वात रोमांचक होता, कारण विराट आणि रोहितने खूप धावा केल्या आणि चाहत्यांची मनं जिंकली. रोहित-विराटने फलंदाजीत सर्वांची मनं जिंकली. तर हर्षित राणाने ४ विकेट्स घेत दमदार कामगिरी केली. टीम इंडियामध्ये वनडे मालिकेसाठी निवड झाल्यानंतर हर्षित राणाला ट्रोल करण्यात आलं. या तरुण वेगवान गोलंदाजाने ऑस्ट्रेलियाच्या मधल्या फळीतील फलंदाजांना झटपट माघारी धाडसं प्रचंड हल्ला चढवला.ट्रॅव्हिस हेड आणि मिशेल मार्श यांनी ऑस्ट्रेलियाला चांगली सुरुवात करून दिली आणि त्यांनी ६१ धावा जोडल्या. मोहम्मद सिराजने ही भागीदारी मोडली आणि त्यानंतर अक्षर पटेलने फिरकीच्या जोरावर विकेट घेतली. त्यानंतर, मॅथ्यू शॉर्ट आणि मॅट रेनशॉ ऑस्ट्रेलियाच्या पुनरागमनाचे नेतृत्व करत असताना, हर्षित आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी सलग धक्के दिले. यासह ऑस्ट्रेलिया संघ ४७ षटकांत फक्त २३७ धावांवर गारद झाला.सिडनीमध्ये खेळल्या गेलेल्या एकदिवसीय मालिकेतील शेवटच्या सामन्यात, टीम इंडियाने ऑस्ट्रेलियाचा एकतर्फी ९ विकेट्सने पराभव केला, ज्यामध्ये रोहित शर्माने शानदार शतकासह आणि विराट कोहलीने दमदार अर्धशतकासह सर्वात मोठी भूमिका बजावली. दोघांनी मिळून १६८ धावांची भागीदारी करून संघाला २३७ धावांचं लक्ष्य सहज गाठण्यास मदत केली. वेगवान गोलंदाज हर्षित राणाने शानदार गोलंदाजी केली, चार विकेट घेतल्या.रोहित शर्माने १२५ चेंडूत १३ चौकार आणि ३ षटकारांसह नाबाद १२१ धावांची खेळी केली. तर विराट कोहलीने ८१ चेंडूत ७ चौकारांसह ७४ धावा केल्या. तर शुबमन गिल २६ चेंडूत २ चौकार आणि एका षटकारासह २४ धावा करत बाद झाला. ऑस्ट्रेलियाने भारताला विजयासाठी २३७ धावांचे आव्हान दिले होते. रोहित-विराटच्या भागीदारीसह भारताने ३८.३ षटकांत २३७ धावा करत सहज विजय मिळवला.या मालिकेच्या सुरुवातीपासूनच सर्वांचे लक्ष विराट कोहली आणि रोहित शर्माच्या पुनरागमनावर होते. प्रत्येक सामन्यातील त्यांची कामगिरी सर्वाधिक चर्चेचा विषय होती.म्हणूनच, पहिल्या दोन सामन्यांमध्ये मालिकेचा निकाल लागला असला तरी, अंतिम सामना चाहत्यांसाठी महत्त्वाचा ठरला आणि सर्वात रोमांचक होता, कारण विराट आणि रोहितने खूप धावा केल्या आणि चाहत्यांची मनं जिंकली.

### रोहित-विराटने मनं जिंकली

रोहित-विराटने फलंदाजीत सर्वांची मनं जिंकली. तर हर्षित राणाने ४ विकेट्स घेत दमदार कामगिरी केली. टीम इंडियामध्ये वनडे मालिकेसाठी निवड झाल्यानंतर हर्षित राणाला ट्रोल करण्यात आलं. या तरुण वेगवान गोलंदाजाने ऑस्ट्रेलियाच्या मधल्या फळीतील फलंदाजांना झटपट माघारी धाडसं प्रचंड हल्ला चढवला.ट्रॅव्हिस हेड आणि मिशेल मार्श यांनी ऑस्ट्रेलियाला चांगली सुरुवात करून दिली आणि त्यांनी ६१ धावा जोडल्या.

# मुंबईच्या राजाची बॅट ऑस्ट्रेलियात तळपली!

## रोहित शर्माचं दणदणीत शतक; विराटबरोबरचं खास सेलिब्रेशन

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**रोहित शर्माने ऑस्ट्रेलियाविरूद्ध आपल्या एकदिवसीय क्रिकेट कारकिर्दीतील ३३वं शतक झळकावलं आहे. सिडनीच्या मैदानावर खेळल्या जात असलेल्या तिसऱ्या वनडे सामन्यात हिटमॅनने हे खास शतकं झळकावलं आहे. मुंबईचा राजा रोहित शर्माचं हे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील ५०वं शतक आहे.**



रोहित शर्माने ऑस्ट्रेलियाविरूद्ध वनडे मालिकेत शानदार कामगिरी केली आहे. पहिल्या सामन्यात ८ धावा, दुसऱ्या सामन्यात ७४ धावा तर तिसऱ्या सामन्यात रोहितने थेट शतक झळकावलं आहे. रोहित शर्माने तिसऱ्या वनडेत महत्त्वपूर्ण खेळी करत आपलं शतक पूर्ण केलं आहे.रोहित शर्माने १०५ चेंडूत ११ चौकार आणि २ षटकारांसह आपलं शतक पूर्ण केलं. रोहितने शतकी खेळी केल्यानंतर काही मोठं सेलिब्रेशन केलं नाही किंवा हेल्मेटदेखील काढलं नाही.

हिटमॅनने मैदानात बॅट उंचावत आपल्या शतकाचा आनंद साजरा केला. फक्त विराट कोहलीला मिठी मारत आपल्या या शतकाचं खास सेलिब्रेशन केलं. रोहित शर्मा आणि विराट कोहली यांची भागीदारी या सामन्यात १२० पार पोहोचली आहे.रोहित शर्माचं या वर्षातील हे दुसरं शतक आहे.

त्याने यापूर्वी फेब्रुवारीमध्ये इंग्लंडविरुद्ध शानदार शतक झळकावलं होतं. सिडनीमध्ये केलेल्या शतकासह, रोहितने त्याच्या निवृत्तीबद्दल चर्चा करणाऱ्या आणि टीकाकारांना परफेक्ट उत्तर दिलं आहेपहिल्या सामन्यात ८ धावा, दुसऱ्या सामन्यात ७४ धावा तर तिसऱ्या सामन्यात रोहितने थेट शतक झळकावलं आहे.

### शतकाचा आनंद साजरा केला

रोहित शर्माने तिसऱ्या वनडेत महत्त्वपूर्ण खेळी करत आपलं शतक पूर्ण केलं आहे.रोहित शर्माने १०५ चेंडूत ११ चौकार आणि २ षटकारांसह आपलं शतक पूर्ण केलं. रोहितने शतकी खेळी केल्यानंतर काही मोठं सेलिब्रेशन केलं नाही किंवा हेल्मेटदेखील काढलं नाही. हिटमॅनने मैदानात बॅट उंचावत आपल्या शतकाचा आनंद साजरा केला.

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। रविवार।
। दि. 26 ऑक्टोबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

मदतीचा हात दिल्याचे समाधान-दिनेश यादव

# मदतीचा हात दिल्याचे समाधान!-दिनेश यादव

## ‘गोधन वाटप उपक्रमा’तून सामाजिक बांधिलकी जपली

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष आणि आमदार महेशदादा लांडगे यांच्या पुढाकाराने मराठवाडा आणि सोलापूर जिल्ह्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा ठरलेला मोफत गोधन वाटप उपक्रम नुकताच राबविण्यात आला आहे.या उपक्रमात युवा मोर्चा शहराध्यक्ष दिनेश यादव यांनीही सक्रिय सहभाग घेत गोधन दान करून सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव जपली. त्यांच्या पत्नी निशा यादव देखील या प्रसंगी उपस्थित होत्या.पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदतीचा हात दिल्याचे समाधान यातून मिळाल्याचे यादव यावेळी म्हणाले..**



दिनेश यादव यावेळी म्हणाले, एक हात मदतीचा' या संकल्पनेतून सुरु झालेल्या या उपक्रमाचा पहिला टप्पा जीवनावश्यक वस्तू आणि अन्नधान्य कीट वाटपाने पार पडला. ५० हून अधिक गाड्यांमधून शेकडो पूरग्रस्त कुटुंबांपर्यंत मदतीचा हात पोहोचवण्यात आला. आता दुसऱ्या टप्प्यात १०० हून अधिक गोधनाचे वाटप करण्यात येत आहे. या अंतर्गत गोपूजन भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र. चव्हाण, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे आणि शहराध्यक्ष शत्रुघ्नबापू काटे यांच्या उपस्थितीत पार पडले.

या उपक्रमांतर्गत यादव यांनी देवगाव खुर्द (ता. परांडा, जि. धाराशिव) येथील शेतकरी दत्तात्रय प्रभावती प्रभाकर चौधरी यांना गोदान करण्यात आले. पूरामुळे जगण्याचा आधार हरवलेल्या शेतकऱ्यांना पुन्हा उभं राहण्यासाठी हा उपक्रम नवसंजीवनी ठरत आहे असे यादव म्हणाले. महेशदादा लांडगे यांच्या या प्रयत्नाने केवळ गोधनच नव्हे, तर समाजातील प्रत्येक घटकासाठी संवेदनशीलतेचे आणि सामाजिक जबाबदारीचे एक आदर्श उदाहरण निर्माण केले आहे.

> “ सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या या उपक्रमात गोधन, चारा आणि मेडिकल कीटचे योगदान देण्यात आले आहे. भारतीय जनता पक्षाचे संस्कार म्हणजे संकटाच्या काळात समाजासोबत खंबीरपणे उभे राहणे आहे. या भूमिकेची प्रचिती या उपक्रमातून पुन्हा एकदा आली आहे.
> **-दिनेश यादव,** अध्यक्ष, भाजपा युवा मोर्चा पिंपरी चिंचवड शहर

# आदिवासी पाड्यावर फुलली आनंदाची दिवाळी!

## दरवर्षीप्रमाणे यंदाही सक्षम सोशल फाउंडेशनतर्फे दिवाळीचा आनंद सर्वांसोबत साजरा

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**दरवर्षीप्रमाणे यंदाही सक्षम सोशल फाउंडेशनतर्फे दिवाळीचा आनंद सर्वांसोबत साजरा करण्यात आला. यामुळे आदिवासी पाड्यावर अक्षरशः आनंदाची दिवाळी साजरी झाली.**

सक्षम सोशल फाउंडेशन अध्यक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर उपाध्यक्ष अतिश आनंदराव बारणे यांच्या पुढाकारातून आणि उद्योजक संतोष सीताराम बारणे यांच्या सहकार्याने आदिवासी भागात दिवाळी फराळ वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत भोमाळे गाव, दीप नगर, शिरगाव-विठ्ठलवाडी, टोकावडे आणि भिसे



वस्ती या भागांमध्ये दिवाळीचा आनंद पोहोचवण्यात आला. समाजातील दुर्लक्षित घटकांपर्यंत आनंदाचे क्षण पोहोचवण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला असल्याचे बारणे म्हणाले.

> “ सक्षम सोशल फाउंडेशनचा हा उपक्रम फक्त फराळ वाटपापुरता मर्यादित नसून समाजाशी जोडलेला आहे. प्रत्येकासोबत आनंद वाटण्याची खरी परंपरा जपणारा आहे. या उपक्रमाद्वारे फाउंडेशनने पुन्हा एकदा सामाजिक बांधिलकीची जाणीव दृढ केली. **-आतिश बारणे,** सक्षम सोशल फाउंडेशन

## मोशी येथील इंद्रायणी नदीच्या घाटावर छटपूजेचे आयोजन

# हजारो भाविकांच्या उपस्थितीत होणार गंगा आरती!

### छटपूजेनिमित्त विश्व श्रीराम सेनेने केला मोशी इंद्रायणी घाट स्वच्छ

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज





**सूर्य देवतेची उपासना करणारे छट पूजा व्रत उत्तर भारतात आणि विशेषतः बिहार मध्ये मोठ्या भक्ती भावाने साजरे केले जाते. मागील अनेक वर्षांपासून पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरात देखील छटपूजा श्री सूर्यषष्ठी महाव्रत मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. गतवर्षी प्रमाणे श्री विश्व श्रीराम सेनेच्या वतीने मोशी येथील इंद्रायणी नदीच्या घाटावर छटपूजा सोमवारी, (दि.२७) सायंकाळी, ६:०४ वाजता, सूर्यास्त वेळी हजारो भाविकांच्या साक्षीने वाराणसी येथून आलेल्या प्रतिनिधींच्या हस्ते भव्य गंगा आरती करून साजरा करण्यात येणार आहे.**

समारोप मंगळवारी (दि.२८) सकाळी ६:३३ वाजता, सूर्योदय वेळी सूर्याला अर्ध्य देऊन होईल. यावेळी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन श्री विश्व श्रीराम सेनेचे संस्थापक अध्यक्ष लालबाबू अंबिकालाल गुप्ता यांनी केले आहे.

यानिमित्त श्री विश्व श्रीराम सेनेच्या वतीने मोशी येथील इंद्रायणी नदी घाटावर शुक्रवारी, शनिवारी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. सध्या इंद्रायणी नदीत कचरा व गाळ साचून पाणी व परिसर अस्वच्छ झाला आहे. नदीत टाकण्यात आलेले निर्माल्य, घट, प्लास्टिक पिशव्या, बाटल्या, काचा, फाटके कपडे, थर्माकोल, लाकडी मंदिरे, प्लेट, ग्लास, नारळ, फळे आदी कचरा व गाळ काढून नदी घाट परिसर झाडून स्वच्छ करण्यात आला.

या नदीघाटा वर भोसरी, मोशी, पिंपरी नेहरू नगर, चिंचवड़, चिंबळी, कुरुळी, कोयाळी, चाकण, मोशी, जाधववाडी, चिखली, निघोजे, आकुर्डी, तळवडे, आळंदी कृष्णानगर आदी भागातून भक्त भाविक पूजे साठी उपस्थित राहणार आहेत. यावेळी पारंपरिक पूजा करून भजन, छट लोकगीते सादर करण्यात येतील व महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे अशी माहिती लालबाबू गुप्ता यांनी प्रसिद्धीस दिली आहे.

---

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिका 12 हजार कोटींची कर्जबाजारी?

### महापालिकेच्या आर्थिक स्थितीबाबत खरी वस्तुस्थिती काय आहे?

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेचे मावळते आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांची नुकतीच बदली झाली. त्यांना 2026 मध्ये नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळा आयुक्तपदाची जबाबदारी मिळाली. पण, IAS अधिकारी शेखर सिंह यांच्या 3 वर्षांच्या काळात महापालिका कर्जबाजारी झाली..?... आर्थिक घडी विस्कळीत झाली... किंबहुना, महापालिका लुटून खाल्ली... असे आरोप झाले.**




शहरातील काही प्रसारमाध्यमे आणि सोशल मीडियामध्ये चर्चा झाली. याउलट, शहरात दोन ठिकाणी शेखर सिंह यांचा नागरी सन्मानही झाला. त्यामुळे शेखर सिंहांच्या कारकीर्दीत महापालिकेची आर्थिक स्थिती सुधारली की बिघडली.. याबाबत संभ्रम निर्माण झाला. याबाबत “दूध का दूध आणि पाणी का पाणी ” करण्याबाबत “महाईन्यूज” च्या माध्यमातून या मुद्यावर ‘FACT CHECK’ करण्यात आले.

पिंपरी-चिंचवडकरांच्या वतीने IAS अधिकारी शेखर सिंह यांचा दोन ठिकाणी भव्य नागरी सन्मान करण्यात आला. एक चिंचवडमध्ये आणि दुसरा भोसरीमध्ये. पण, आयुक्तांच्या बदलीचे आदेश प्राप्त झाले. तसे शहरात आयुक्तांच्या कारकीर्दीवर प्रश्नचिन्ह निर्माण होईल, असे वातावरण निर्मिती करण्यात आली. त्यामध्ये “महापालिकेवर तब्बल 12 हजार कोटी रुपयांचे कर्ज आहे...” असा धक्कादायक दावा करण्यात आला.यावर, नागरी सन्मान सोहळ्यातील मुलाखतीच्या कार्यक्रमात याबाबत IAS अधिकारी शेखर सिंह यांनी खंतही व्यक्त केली. शहरातील विकासकामे आणि प्रकल्पांबाबत मतभिन्नता असणे, स्वाभाविक आहे. पण, राजकीय उद्देशाने ‘फेक नॅरेटिव्ह’ केला जातो, ही बाब शहराच्या हिताची नाही, अशी चिंताही व्यक्त केली.

#### महापालिकेची आर्थिक स्थिती कशी आहे?

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला क्रीसील व केअर या क्रेडीट रेटींग संस्थेने AA+ STABLE क्रेडीट रेटींग पत मानांकन दिले आहे. जे महानगरपालिकेची आर्थिक स्थिती उत्तम असल्याचे ध्योतक आहे. तसेच, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 10 कलम 109 व 110 नुसार महापालिकेस शासनाच्या पूर्व मंजुरीने कर्ज घेण्याचे अधिकार आहेत. त्यानुसार महापालिकेने चिंचवडमधील एम्पायर इस्टेट फ्लायओव्हर ब्रिजसाठी 30 वर्षांच्या मुदतीने 159.91 कोटी रुपयांचे कर्ज घेतले आहे. त्यापैकी 91.90 कोटी रुपयांची परतफेड केली आहे. मुळा नदी सुधार प्रकल्प 4 वर्षांच्या मुदतीसाठी 200 कोटी रुपयांचे कर्ज घेतले आहे. त्यापैकी 90 कोटी रुपयांची परतफेड केली आहे. भोसरीमधील हरीत सेतू आणि टेल्को रोड प्रकल्पासाठी 5 वर्षांच्या कालावधीकरिता 200 कोटी रुपयांचे कर्जरोखे घेण्यात आले. त्यापैकी 13.50 कोटी रुपयांची परतफेड केली आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार, आतापर्यंत महानगरपालिका प्रशासनाने एकूण 559.91 कोटी रुपयांचे कर्ज घेतले आहे.

## पीसीसीओईआरच्या विद्यार्थ्यांचा

# 'एक दिवा अनाथांसाठी'!

### शिक्षण विश्व: इम्मानुएल अनाथाश्रमात दीपोत्सव

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च (पीसीसीओईआर) येथील मधील अॅप्लाइड सायन्स अँड ह्युमॅनिटीज विभागांतर्गत एफइएसए आणि लाईफ स्किल्स सेल यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाळी निमित्त सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.**




या उपक्रमात प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कल्पकतेचा आणि कलात्मकतेचा वापर करून आकाश कंदिल आणि हाताने रंगवलेले दिवे तयार केले. या वस्तूंची विक्री "दीपोत्सव" या उपक्रमातून करण्यात आली आणि त्यातून जमा झालेला निधी चिंचवड येथील इम्मानुएल अनाथाश्रमाला देणगी देण्यात आली. तसेच महाविद्यालयाच्या वतीने धान्य, किराणा साहित्य, मिठाई आणि इतर आवश्यक वस्तू आश्रमात देण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी आश्रमातील मुलांसोबत खेळ खेळून दिवाळीचा आनंद द्विगुणित केला. यावेळी कॉलेजचे संचालक, प्राचार्य डॉ. हरीश तिवारी, विभागप्रमुख प्रा. शीतल पाटील, कार्यक्रम समन्वयक प्रा. प्रिया ओघे, प्रा. निलेश ठुबे, प्रा. रूपाली पाटील, प्रा. गजानन जाधव, प्रा. रेणुका परदेशी, प्रा. वैशाली निंबाळकर, विद्यार्थी प्रतिनिधी पार्थ निकुंभ, अर्थव देशमुख, राजवर्धन शितोळे, वेदका पाटील, सौम्या बुकने, जिया आवटे, प्रणिता माणे, सनाथकुमार पोल, श्लोक पाटील, पुर्वेश चाटे उपस्थित होते.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये समाजसेवेची जाणीव अधिक दृढ झाली, तसेच आश्रमातील मुलांची दिवाळी आनंद, प्रकाश आणि मायेने उजळली. महाविद्यालय नेहमीच विद्यार्थ्यांमध्ये संवेदनशीलता, सामाजिक जबाबदारी आणि मानवतावादी मूल्ये रुजविण्यासाठी प्रयत्नशील असते, असे डॉ. हरीश तिवारी म्हणाले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




www.rklgis.org
RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
ADMISSION OPEN
FOR THE YEAR 2026-27
NURSERY - STD X
What we Offer?
CBSE Curriculum
Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
Digital Classrooms with AV Facilities
Skill Development Programs: Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
Focus on Holistic Development
Enroll Now!
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune